पुढारी पान क्र.5

दि. 13/05/2023

# ५० लाख रुपयांचे दागिने परत, ८ आरोपींना केली अटक

## धीरेंद्र शास्त्रींच्या प्रवचन कार्यक्रमात दागिन्यांची चोरी

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड येथे धिरेंद्र शास्त्री यांच्या प्रवचन कार्यक्रमात चोरी झालेल्या दागिने गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा व मिरारोड पोलीस ठाणे यांनी तपास करून गुन्ह्यात चोरी केलेले ५० लाख रुपये किमतीचे ८२८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. ते दागिने नागरिकांना परत देण्यात आले आहेत. या गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.



प्रवचन कार्यक्रमात चोरी केलेले ५० लाख रुपये किमतीचे ८२८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व लगडी असा मुद्देमाल हस्तगत केले आहे. हा मुद्देमाल मिरा रोड येथे शुक्रवारी झालेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान मधुकर पांडे, पोलीस आयुक्त यांच्या हस्ते नागरिकांना परत देण्यात आला.

मिरारोड येथे १८ मार्च व १९ मार्च २०२३ रोजी बागेश्वर धामवाले बाबांच्या कार्यक्रमासाठी आलेल्या भाविकांपैकी सुमारे ६० महिला व १ पुरुष यांच्या गळ्यातील सुमारे ९९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरी केले होते. त्याबाबत मिरारोड पोलीस ठाण्यात जबरी चोरीचे ४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा व मिरारोड पोलीस ठाणे यांनी केला आहे. या गुन्हयांचा तपास करून गुन्हे करणारे आरोपी हे राजस्थान मधील भरतपुर व अलवर जिल्हयातील राहणारे आहेत. यातील आरोपी महिला व पुरुष हे धार्मिक, राजकीय, सामाजिक कार्यक्रमाच्या ठिकाणी गर्दीचा फायदा घेऊन ज्या इसमांची चोरी करायची आहे त्याच्या भोवती गराडा करुन त्याचे गळ्यातील मंगळसुत्र, चैन, हार असे दागिण्यांची चोरी करायचे. पोलिसांनी यासाठी ४ विशेष पोलिस पथके तयार केली. ही विशेष पथके ३० दिवस भरतपूर, अलवर जिल्ह्यातील धोकादायक परिसरात राहून स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने आरोपी गीतादेवी सरदार सिंग, सेतू करमबीर सिंग, अर्जुन सिंग बीरेंद्र बावरिया, हेमा उर्फ हिरोदेवी सूरज, पिंकी सूर्यप्रताप सिंग उर्फ राहुल, राह खेरथल, रेश्मा हिराराम बावरिया उर्फ संत्रा बिरेंदर बावरिया, सोनिया अनिल कुम्हार, रणजितकुमार उर्फ प्रवीणकुमार जगदीश प्रसाद बावरिया यांना ताब्यात घेऊन केलेल्या तपासामध्ये या आरोपींचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली.

पुढारी पू. पान क्र.2

## रिक्षा, बीम चोरणाऱ्याला अटक

**मिरारोड :** पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत चोरी करणाऱ्या आरोपीस पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून त्याने केलेले २ गुन्हे उघडकीस आणले आहेत. पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत नालासोपारा (पु.) येथील रुद्र कॉर्पोरेशन फेब्रिकेशन वर्क कंपनी बाहेर ठेवलेली एक २० हजार रुपये किंमतीची फेब्रिकेशन लोखंडी कंपोजिट बिम, कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करून नेलेबाबत संतोष शशिकांत पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये १७ एप्रिल २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी निखील भोईर (२०) यांस ताब्यात घेवून तपास केला. त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेली रिक्षा ही नायगाव पूर्व येथुन चोरी करुन गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. या आरोपीस अटक करुन याच्या कडून एक लोखंडी कंपोजिट बिम व एक ऑटो रिक्षा असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपी याचेवर यापूर्वी वालीव पोलीस ठाणे व पेल्हार पोलीस ठाणे येथे वाहन चोरी वइतर चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र.3 दि.13/05/2023

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय संभ्रमात टाकणारा

## मिरा-भाईंदरच्या मेळाव्यात राज ठाकरे यांची प्रतिक्रिया

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

ठाकरे, शिंदे गटातील संघर्षावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे पडदा पडला असला तरी आलेला निर्णय बराच कन्फ्युजिंग करणारा आहे. सगळी प्रोसेस चुकली पण मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला नको होता, यात बरेच कन्फ्युजिंग करणारे असल्याने त्याची धूळ खाली बसल्यानंतर आपल्याला कळेल की नेमकं काय झालं, अशी प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाईंदर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली.

राज ठाकरे हे शुक्रवारी पालघर दौऱ्यावर आले होते. दरम्यान त्यांनी मिरा-भाईंदरमधील मनसे कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला हजेरी लावून स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तत्पूर्वी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना ठाकरे, शिंदे गटातील संघर्षाच्या खटल्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावरील प्रतिक्रियेबावत विचारण्यात आले असता त्यांनी वरील प्रतिक्रिया दिली. शिवसेनेतून बाहेर पडून भाजपसोबत गटबंधन करून शिंदे गटाने राज्यात सत्ता स्थापन केली. सेनेतील १६ आमदारांना अपात्र ठरविण्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होता. सत्ता स्थापनेदरम्यान पार पडलेली प्रोसेस चुकल्याचे स्पष्ट करून त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला नको होता, असा निर्णय न्यायालयाने दिला. शिंदे यांच्या विधिमंडळातील गटाला पक्ष म्हणून समजले जाणार नाही. मूळ पक्षालाच मान्यता असल्याचे न्यायालयाने म्हटले. दरम्यान निवडणूक आयोगाने शिंदे गटाला दिलेले पक्षाचे नाव व चिन्ह याचे आता काय होणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

यात निवडणूक आयोग एक यंत्रणा आहे, सर्वोच्च न्यायालय एक यंत्रणा आहे, सर्वोच्च न्यायालयाकडून आलेल्या बाबी, यातून निवडणूक आयोग काय करणार, अनेकदा आपल्याला न्यायालयाच्या तसेच पोलिसांच्या नोटीसा येत असतात त्यातुन आपल्याला कळत नाही, की त्यांनी आपल्याला सोडलं कि अटक केली. त्यांची भाषाच कॉम्प्लिकेटेड असते. यामुळे हे सगळं कन्फ्युजिंग करणारे आहे. ही धूळ जेव्हा खाली बसेल तेव्हा आपल्या सगळ्यांना कळेल कि नेमकं काय झालं, अशी प्रतिक्रिया त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर दिली. तर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना त्यांनी कुठच्याही मुख्यमंत्र्याने जपूनच राहिले पाहिजे.

आधीचे मुख्यमंत्री जपून नाही राहिले म्हणून आज हे सगळं उभं राहिलं. प्रत्येकाने जपून राहिलेच पाहिजे आज आपण कुठल्या पदावर बसलो आहोत. बऱ्याच दिवसापासून आम्ही चर्चा करीत होतो की, ठाणे जिल्ह्याचा मला दौरा करायचा आहे. तो आता आखला आहे. २०२४ मध्ये निवडणुका आहेत. निवडणुकांच्या दृष्टिकोनातून महानगरपालिका, जिल्हापरिषदा आणि लोकसभा, विधानसभा निवडणुका आहेत. त्याचा अंदाज घेण्यासाठी आपण आलो आहोत. तसेच स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे जाणून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढारी पू. पान क्र.3

# मांडवी पोलीस ठाण्यात वर्षभरात ३३६ दखलपात्र गुन्हे

- २४९ गुन्हे उघड, १४१ आरोपी जेरबंद
- ८५ लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भायंदर पोलीस आयुक्तालयातील नव्याने अस्तित्वात आलेल्या वसई तालुक्यातील मांडवी पोलीस ठाण्याला ११ मे रोजी वर्ष पूर्ण झाले. या वर्षभरात ३३६ दखलपात्र गुन्हे दाखल झाले होते.

त्यातील पोलिसांनी आतापर्यंत २४९ गुन्हे उघडकीस आणून या गुन्ह्यातील १४१ आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. तर अदखलपात्र गुन्ह्यांची संख्या ही ६८२ असून यामध्ये ९७ समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी पोलीस ठाणे वर्षपूर्ती कार्यक्रमात बोलताना दिली. यावेळी परिसरातील अनेक मान्यवर, नागरिक, पोलीस उपस्थित होते. जनतेच्या सोईकरिता आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता विरार पोलीस ठाण्याचे विभाजन होऊन मागीलवर्षी ११ मे रोजी मांडवी पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. नागरी आणि दुर्गम डोंगरी भाग असलेल्या मांडवी पोलीस ठाणे हद्दीत ३२ गावे आणि कैक दुर्गम पाडे, वस्त्या आहेत. आरोपींकडून ८५,१५,५६६ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच अदखलपात्र स्वरूपाचे ६८२ गुन्हे दाखल आहेत.

**कार्यक्षम कमिटी निर्मिती:**

पोलीस ठाणे हद्दीत शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मोहल्ला कमिटी, शांतता कमीटी, महिला दक्षता कमीटी, पोलीस काका-पोलीस, पोलीस दिदी, बाल पोलीस या सारख्या कमीटी स्थापन करून कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत असे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.

Scanned with CamScanner

दि. १३/०५/२०२३

# आर्यनला उचलणारे वानखेडेच अडकले

## सीबीआयचा आरोप : अटक न करण्यासाठी २५ कोटी मागितले | मुंबई, दिल्ली, रांचीसह २९ ठिकाणी छापेमारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कॉर्डिलिया क्रूझवर सापडलेल्या अमली पदार्थ प्रकरणात अभिनेता शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खान याला अटक न करण्यासाठी २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा ठपका ठेवत सीबीआयने आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्यासह नार्कोटिक्स कन्ट्रोल ब्युरोचे (एनसीबी) अन्य दोन अधिकारी, या प्रकरणातील पंच किरण गोसावी आणि अन्य काही जणांविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी वानखेडे यांच्या मुंबईतील ओशिवरा येथील निवासस्थानासह दिल्ली, रांची, कानपूर, लखनौ, गुवाहाटी, चेन्नई अशा २९ ठिकाणी छापेमारी केली आहे.

आर्यन खान प्रकरणात लाचखोरी झाल्याचा तपास करण्यासाठी एनसीबीने सीबीआयला पत्र लिहिले होते. प्राथमिक पडताळणी झाल्यानंतर शुक्रवारी सीबीआयने छापेमारी करत वानखेडे, एनसीबीतील तत्कालीन अधीक्षक विश्वविजय सिंह, गुप्तचर अधिकारी आशीष रंजन, आर्यन खानच्या अटकेनंतर त्याच्यासोबतचा फोटो व्हायरल करणारा आणि या प्रकरणातील पंच किरण गोसावी व अन्य काही जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यापैकी अधीक्षक विश्वविजय सिंह याला अलीकडेच बडतर्फ करण्यात आले आहे.



मुंबईत गोरेगाव येथील इम्पेरियल हाईट्स या इमारतीत समीर वानखेडे यांचा महागडा फ्लॅट आहे.



धक्कादायक गोष्ट म्हणजे, या २५ कोटींपैकी **५०** लाख रुपयांची लाच वानखेडे व त्यांच्या पथकाने स्वीकारल्याचा ठपकाही सीबीआयने ठेवला आहे.

### प्रकरण काय?

- एनसीबीच्या मुंबईतील विभागीय संचालकपदी असताना समीर वानखेडे यांनी ३ ऑक्टोबर २०२१ रोजी कॉर्डिलिया क्रूझवर छापेमारी केली होती.
- क्रूझवरुन अमली पदार्थांचा साठा जप्त करतानाच क्रूझवर जाणाऱ्या आर्यन यालाही अटक केली होती.
- आर्यनला अटक न करण्यासाठी वानखेडे आणि त्यांच्या पथकाने २५ कोटींची लाच मागितल्याचा ठपका सीबीआयने त्यांच्यावर ठेवला आहे.
- क्रूझवरील कारवाईनंतर समीर वानखेडे हे अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले होते.
- आर्यन प्रकरणातही त्यांनी अनेक प्रक्रिया व्यवस्थित पार पडल्या नसल्याचा ठपका त्यांच्यावर होता.
- या प्रकरणी त्यांच्यासह एनसीबीच्या सात अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी झाली होती.
- यानंतर एनसीबीने सीबीआयला पत्र लिहून वानखेडे व त्यांच्या पथकातील लोकांची भ्रष्टाचार प्रकरणात चौकशी करण्यास सांगितले होते.
- क्रूझ प्रकरणी आर्यन खान याच्याविरुद्ध कोणताही पुरावा नसल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयाने मे २०२२ मध्ये त्याची निर्दोष मुक्तता केली होती.

# परमबीर सिंह यांचे निलंबन रद्द, आरोपही मागे

## राज्य सरकारचा निर्णय; निलंबन काळ 'ड्युटी' गृहित धरणार, वेतन व भत्तेही मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुलीचा आरोप करून खळबळ उडवून देणारे मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांचे निलंबन रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सरकारने त्यांच्यावरील आरोपही मागे घेतले आहेत. तसेच त्यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून गणला जाईल असाही निर्णय सरकारने घेतला आहे. गृहखात्याने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

अखिल भारतीय सेवा (शिस्त आणि अपील) नियम, १९६९ च्या नियम ८ अंतर्गत परमबीर सिंह यांच्याविरुद्ध जारी केलेले आरोपपत्र मागे घेण्यात येत असून हे प्रकरण आता बंद करण्यात येत आहे. तसेच अखिल भारतीय सेवा, नियम १९५८ च्या तरतुदीनुसार सिंह यांचा २ डिसेंबर २०२१ ते ३० जून २०२२ पर्यंतच्या निलंबन कालावधीतील वेतन व भत्तेही त्यांना मिळतील, असे आदेशात म्हटले आहे.

रिलायन्स समूहाचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांच्या अँटेलिया निवासस्थानासमोर स्फोटके आढळून आल्यानंतर परमबीर सिंह यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून तेव्हाचे गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुलीचा आरोप केला होता.



### आघाडी सरकारने केली होती कारवाई

आघाडी सरकारने परमबीर सिंह यांना पोलिस आयुक्त पदावरुन हटवून त्यांनी केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी चांदीवाल आयोग नेमला होता. तसेच सिंह यांना २ डिसेंबर २०२१ रोजी निलंबित केले होते. त्याचवेळी सिंह यांच्याविरोधात खंडणी, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचे आरोप झाले होते. याविरोधात परमबीर सिंह यांनी न्यायालय तसेच केंद्रीय प्रशासकीय लवादाकडे दाद मागितली होती.

Scanned with CamScanner

म.टा.पू.पान क्र.1

दि. 13/05/2023

# कचऱ्याचा प्रश्न मार्गी

## वसई-विरारमध्ये राडारोडा विल्हेवाट प्रकल्प

- सरकारकडून सात कोटींचा निधी मंजूर
- दोन कोटींचा निधी पालिकेला सुपूर्द

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई-विरार शहरात रस्त्याच्या कडेला राडारोडा टाकण्याचे प्रमाण वाढू लागल्याने शहरातील राडारोड्याच्या व्यवस्थापनासाठी महापालिकेने प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पासाठी सात कोटींच्या निधीला सरकारने मंजुरी दिली आहे. तसेच, पहिल्या टप्प्यातील दोन कोटींचा निधी पालिकेला प्राप्त झाला असून लवकरच या प्रकल्पाला चालना मिळू शकेल. त्यामुळे आता रस्त्यावरील राडारोड्याच्या ढिगाऱ्यांची विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे.

वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील अनेक मुख्य रस्त्यांच्या कडेला तसेच, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला राडारोड्याचे ढीग टाकून दिले जातात. शहरात विकासकामे झपाट्याने सुरू आहेत. बऱ्याच ठिकाणी जुनी बांधकामे तोडली जात आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सिमेंट काँक्रीटचे व इतर साहित्य रस्त्यावर दिसून येत आहेत. त्यामुळे महामार्गाला अवकळा आली आहे. महामार्ग प्राधिकरणाचे या सगळ्या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस हा राडारोडा आणून टाकण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. विशेषतः रात्रीच्या सुमारास हा राडारोडा आणून टाकला जातो. तर, काही ठिकाणी खासगी जागेतही टाकला जातो. अशा ठिकाणचा कचरा उचलून त्याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा पालिकेकडे नसल्याने पालिकेने या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी पालिकेने 'सी अँड डी वेस्ट' प्रकल्प हाती घेतला आहे. या कचऱ्याची विल्हेवाट तसेच, प्रक्रिया या प्रकल्पामार्फत करण्यात येणार आहे. हा प्रकल्प गोखिवरे येथील डम्पिंग ग्राऊंडवर उभा केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी पालिकेला सात कोटींचा निधी अपेक्षित आहे. त्यातील दोन कोटींचा निधी पहिल्या टप्प्यात पालिकेला केंद्र आणि राज्य सरकारने दिला आहे. तसेच, तांत्रिक तपासणीसाठी संबंधित यंत्रणेकडे या प्रकल्पाचा अहवाल पाठवण्यात आला आहे. त्यानंतर याबाबतची माहिती केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्यानंतर प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात येईल, असे पालिकेच्या उपायुक्त चारुशीला पंडित यांनी सांगितले.



### घनकचरा व्यवस्थापनासाठी २४४ कोटींची तरतूद

महानगरपालिका शहरात निर्माण होणारा कचरा महानगर पालिकेच्या गोखिवरे क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो. क्षेपणभूमीवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत 'सी अँड डी वेस्ट' प्रकल्प आणि इतर प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. यासाठी पालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात एकूण २४४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये कचरा हस्तांतरणासाठी दोन प्रकल्प

- केंद्र सरकारकडून २० कोटींचा निधी मंजूर
- मध्यवर्ती ठिकाणी जागेचा शोध सुरू

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये दोन कचरा हस्तांतरण प्रकल्प उभारण्याचे पालिकेने निश्चित केले आहे. या कामासाठी केंद्र सरकारकडून २० कोटींचा निधीही मंजूर झाला आहे. कचरावाहतुकीवर होणाऱ्या खर्चात कपात करण्याच्या दृष्टिकोनातून हा निर्णय पालिकेच्या वतीने घेण्यात आला आहे. हा प्रकल्प उभारण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागेचा शोध सुरू करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीत दररोज ओला व सुका अशा स्वरूपात ४५० टनांहून अधिक कचरा तयार होतो. हा कचरा जमा करून प्रक्रिया करण्यासाठी उत्तनच्या धावगी येथील कचरा प्रकल्पात टाकला जात आहे. या कामासाठी कंत्राटी व मनपा मालकीच्या अशा एकूण १०० हून अधिक वाहनांचा वापर केला जात आहे. शहरापासून उत्तन येथील कचरा प्रकल्प हे अंतर अधिक आहे. त्यामुळे पालिकेचा दर महिन्याला लाखो रुपयांचा खर्च हा कचऱ्याच्या वाहतुकीवर होतो. या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर दोन कचरा हस्तांतरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पात असणाऱ्या यंत्रात ओला व सुका कचरा जमा केल्यानंतर वाहनांच्या मदतीने टाकला जाणार आहे. या कचऱ्यावर दाब टाकून तो कमी जागेत अधिक प्रमाणात डब्यात भरला जाणार आहे. नंतर हे डबे कचरा गाडीला जोडून कचरा प्रकल्पात नेले जाणार आहेत.

यामुळे कमी वाहनांमध्ये अधिक प्रमाणावर कचरा वेऊन जाणे पालिकेला शक्य होणार आहे. परिणामी, वर्षाकाठी तीन ते चार कोटी रुपयांची बचत होणार असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. या प्रकल्पासाठी पालिकेला स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत केंद्र सरकारकडून २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एक प्रकल्प उभारण्यासाठी किमान एक एकर जागा लागणार आहे. या जागेचा शोध पालिकेकडून शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी घेतला जात असल्याची माहिती महापालिका उपायुक्त रवी पवार यांनी दिली.

## हत्या प्रकरणातील आरोपी सात वर्षांनी अटकेत

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर



मिरा-भाईंदरच्या काशिमिरा पोलिस ठाण्यात हत्येप्रकरणी दाखल असलेल्या २०१६ मधील गुन्ह्यात एका आरोपीला नुकतीच अटक करण्यात आली आहे. हा आरोपी सहा वर्षांपासून फरार होता. त्याला तांत्रिक माहितीच्या आधारे विरारमधून अटक करण्यात काशिमिरा पोलिसांना यश आले आहे. सौम्यराज खिरोद दास असे त्याचे नाव आहे.

मुंबईतील जोगेश्वरी परिसरात राहणारा २५ वर्षीय सचिन मोहिते हा तरुण त्याला पूर्वी दिलेले ३९ लाख रुपये परत करत नसल्याने त्याचे अपहरण करण्यात आले होते. प्रथम सचिनला गोरेगावमधील एका खासगी कार्यालयात नेऊन त्याला ११ जणांकडून मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर त्याला काशिमिरा परिसरातील एका हॉटेलमध्ये घेऊन गेले. त्याला पुन्हा बेदम मारहाण करण्यात आली. यात सचिनचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह पालघरच्या मनोर परिसरात टाकून देण्यात आला होता. या प्रकरणी २०१६ साली सुरवातीला सफाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नंतर तपासात मिरा-भाईंदरमध्ये करण्यात आलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाल्याची बाब समोर आल्यानंतर काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा वर्ग करण्यात आला होता.

याप्रकरणी पोलिसांनी त्यावेळी नऊ आरोपींना अटक केली असली तरी दोघे फरार होते. यातील एक सौम्यराज खिरोद दास हा मागच्या अनेक वर्षांपासून मिळत नव्हता. त्याचा मोबाइल क्रमांक नुकताच पोलिसांच्या हाती लागला. यावरून काशिमिरा पोलिसांनी सौम्यराजला वसईतून अटक केली आहे.

सामना पान क्र.7

## दागिन्यांवर डल्ला

वसई : विशालनगर येथील संजेरी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या निकहत खान यांच्या घरी चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे. खान या घरी नसताना चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप फोडून कपाटाच्या तिजोरीत असलेले सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम असा सुमारे दहा लाखांचा ऐवज पळवून नेला. माणिकपूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

म.टा. महामुंबई पान

दि. 13/05/2023

# पोलिस ठाण्यांत बालन्याय कक्ष आहे का?

**उच्च न्यायालयाचे खातरजमा करण्याचे निर्देश**



**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

गुन्हेगारी कृत्यात सहभाग असलेल्या लहान व अल्पवयीन मुलांबाबतची प्रकरणे हाताळण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात विशेष पोलिस कक्ष आहेत की नाहीत आणि ते कार्यरत आहेत का, याची राज्य सरकारने खातरजमा करावी. तसेच राज्याच्या पोलिस महासंचालकांनी याबाबत सर्व जिल्ह्यांच्या पोलिस अधीक्षकांकडून व शहरांच्या पोलिस आयुक्तांकडून अहवाल मागवावेत, असे निर्देश उच्च न्यायालयाने नुकतेच दिले. लहान मुलीवर बलात्कार करणाऱ्या अल्पवयीन मुलाविरोधात प्रौढाप्रमाणे खटला चालवण्यास विरोध करणाऱ्या अर्जावरील निर्णयाच्या निमित्ताने न्या. भारती डांगरे यांनी हे निर्देश दिले.

मुंबईत दाखल झालेल्या या गुन्ह्याच्या प्रकरणात लहान मुलगी घराबाहेर खेळत असताना अल्पवयीन आरोपीने तिला त्याच्या घरात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. घरात आल्यानंतर आपली मुलगी रडत असल्याचे पाहून आईने चौकशी केल्यानंतर सारा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर आईने मुलाच्या घरी जाऊन जाब विचारला असता, मुलाने घरातून पळ काढला. अखेर आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी एफआयआर नोंदवत कायदेशीर कारवाई केली. तसेच १६ वर्षांहून अधिक वयाच्या या आरोपीविरोधात तपासाअंती बलात्काराच्या आरोपांखाली भादंवि व पोक्सो कायद्यांतर्गत आरोपपत्र दाखल केले. बालन्याय (लहान मुलांची काळजी व संरक्षण) कायद्यातील तरतुदीप्रमाणे शहर बालन्याय मंडळाच्या प्रधान न्यायदंडाधिकाऱ्यांनी प्राथमिक मूल्यांकन केल्यानंतर विशेष पोक्सो न्यायालयाकडे अहवाल पाठवला होता. त्या अहवालाचा विचार केल्यानंतर आरोपीविरोधात प्रौढाप्रमाणे खटला चालवण्याचा आदेश पोक्सो न्यायालयाने १५ नोव्हेंबर २०२२ रोजी काढला. त्याला आव्हान देणारा पुनर्विलोकन अर्ज आरोपीने अॅड. अजय लाड यांच्यामार्फत केला होता.

'आरोपीला खोट्या प्रकरणात गोवले आहे. शिवाय केवळ गंभीर गुन्हा असल्याच्या कारणाखाली अल्पवयीन मुलाविरोधात प्रौढाप्रमाणे खटला चालवला जाऊ शकत नाही. असा आदेश काढण्यापूर्वी न्यायदंडाधिकाऱ्यांनी मुलाची मानसिक व शारीरिक क्षमता, कृत्याच्या परिणामांविषयीची जाणीव याबद्दल कायद्याच्या कलम १५ अन्वये योग्य मूल्यांकन करणे बंधनकारक आहे. या प्रक्रियेचे योग्य पालन झालेले नाही. सरकारी जे. जे. रुग्णालयातील मानसशास्त्र विभागातील प्राध्यापकांचा समावेश असलेल्या ज्या पथकाने मुलाचे मानसिक मूल्यांकन केले, त्यात संबंधित अनुभव असलेले मानसशास्त्रज्ञ नव्हते', असा युक्तिवाद अॅड. लाड यांनी मांडला. तर त्या अहवालात मानसशास्त्रज्ञ यांनी केलेल्या मूल्यांकनाचाही समावेश असल्याचे सरकारी वकील वाय. एम. नाखवा यांनी निदर्शनास आणले. अखेर सर्व बाजू तपासल्यानंतर अहवाल बनवण्यात मानसशास्त्रज्ञाचा समावेश होता आणि पथकातील इतर सदस्यांना अल्पवयीन रुग्णांवरील उपचारांचा अनुभव असण्याचीही शक्यता आहे, असे निरीक्षण न्या. डांगरे यांनी नोंदवले.

तसेच पोक्सो न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्याचे कारण दिसत नाही, असे स्पष्ट करून अर्ज फेटाळला. त्याचवेळी अशा प्रकरणांची योग्य हाताळणी करण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात विशेष बालन्याय कक्ष असणे कायद्याने व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंधनकारक असल्याने प्रत्यक्षात तशी वस्तुस्थिती आहे का, याची खातरजमा करण्याचे निर्देश न्यायमूर्तींनी दिले.

लोकसत्ता पान क्र.17

# खेळाडूंच्या आंदोलनाला वसईतून पाठिंबा

**वसई:** भारतीय महिला खेळाडूंवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात तसेच जंतर-मंतरवर खेळाडूंच्या सुरू असलेल्या आंदोलनाला वसईतील विविध पक्षांतर्फे पाठिंबा देण्यात आला आहे. ह्यसेक्युलर महामोर्चाह्न तर्फे दररोज संध्याकाळी वसई बस स्थानकात आंदोलन करण्यात येत आहे. रवि भूषण, अशोक पांडे. कुमार राऊत, जॉन परेरा, जितेंद्र सतपाळकर, अलताफ शेख, मुकेश गोपी पिले, प्रकाश यादव आदी या आंदोलनात सहभागी होत आहेत.



Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. 16 दि. 13/05/2023

# अनधिकृत बांधकामांची यादी अद्याप जाहीर नाही

## केंद्रीय मंत्र्यांच्या आदेशाकडे महापालिकेचे दुर्लक्ष

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** शहरातील अनधिकृत बांधकामांची यादी १ मेपर्यंत जाहीर करण्याच्या केंद्रीय मंत्र्यांच्या आदेशाची पालिकेने पूर्तता केलेली नाही. शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी त्याची यादी जाहीर करून कारवाई करण्याचे आदेश केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी नुकतेच दिले होते.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी मागील महिन्यात १८ एप्रिल रोजी वसई-विरार महापालिकेला भेट दिली होती. यावेळी त्यांनी शहरातील विविध नागरी समस्या व विकासकामांची माहिती घेण्यासाठी आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी शहरातील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा समोर आला होता. या अनधिकृत बांधकामांमुळे शहर बकाल होत असून नागरी सोयीसुविधांवर ताण पडू लागला आहे. याबद्दल केंद्रीय मंत्र्यांनी संताप व्यक्त करून कडक कारवाईचे निर्देश दिले होते. शहरातील अनधिकृत बांधकामांची नेमकी काय स्थिती आहे, किती बांधकामे अनधिकृत आहेत याची माहिती जनतेला व्हावी तसेच कारवाई करता यावी यासाठी या बांधकामांची यादी बनविण्याचे आणि १ मे रोजी यादी जाहीर करण्याचे आदेश त्यांनी आयुक्तांना दिले होते. मात्र अद्यापही पालिकेने अशा प्रकारची यादी जाहीर केलेली नाही.

भाजपचे वसई, विरार जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी आयुक्त अनिलकुमार पवार यांना पत्र लिहून मंत्र्यांच्या आदेशानुसार यादी जाहीर केली असेल तर त्याची माहिती नागरिकांना विविध माध्यमातून द्यावी अशी मागणी केली आहे. सर्व अनधिकृत बांधकामांची यादी आणि त्या परिसरात बांधलेल्या घरांची व गाळ्यांची संख्या वर्षानुसार महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

# प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीबाबत संभ्रम कायम

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत शासनाने अद्याप निर्णय जाहीर केलेला नाही. दुसरीकडे वसई विरार महापालिकेने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना बंदी घातली आहे. त्यामुळे याबाबत शासनाने धोरण जाहीर करण्याची मागणी वसई, विरारमधील मूर्तिकारांनी राज्य शासनाकडे केली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने ऑगस्ट २०२२ रोजी परिपत्रक काढून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचा वापर करू नये, असे आदेश काढले होते. त्याचा आधार घेत पालिकेने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना बंदी घातली आहे. मागील वर्षीदेखील पालिकेने बंदी घातली होती, पण शासनाने परवानगी दिली होती. त्यामुळे या वर्षीदेखील संभ्रम आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून मूर्ती बनविण्याचे कारखाने सुरू होतात. शासनाने निर्णय घ्यायला उशीर केला तर आमचे आर्थिक नुकसान होईल, जर आम्ही मातीच्या मूर्ती बनवायला सुरुवात केली आणि शासनाने बंदी उठवली तर आमच्या मातीच्या मूर्ती कोण घेणार असा सवाल मूर्तिकारांनी केला आहे. मातीच्या मूर्ती या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या तुलनेत महाग असतात. देखभाल करणेदेखील कठीण असते. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवणे, ने-आण करणे सोपे असते. त्या स्वस्तही असतात म्हणून त्याला पसंती असते, मूर्तिकारांचे म्हणणे आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. 16 दि. 13/05/2023

# मार्गिका खुली होण्यापूर्वीच तडा

## नायगाव उड्डाणपुलाच्या बांधकामाबाबत प्रश्नचिन्ह

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** नायगाव उड्डाणपुलावर नायगाव कोळीवाडा या दिशेने जाणारी मार्गिका अजूनही बंदच आहे. मात्र ही मार्गिका खुली होण्यापूर्वीच या मार्गिकेला तडे गेले आहेत. त्यामुळे पुलाच्या बांधकामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नायगाव पूर्व-पश्चिमेला जोडणारा १.३ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल मुंबई महानगर विकास प्राधिकरणा (एमएमआरडीए) ने तयार केला आहे. वाहतुकीसाठी हा पूल खुला आहे. या उड्डाणपुलामुळे वसई-विरार ते मुंबई, ठाणे- मीरा-भाईंदर या ठिकाणी प्रवास करण्याचे अंतर कमी झाले आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गही जवळ असल्याने या पुलावरून होणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हा पूल खुला झाला असला तरी या पुलाची नायगाव कोळीवाडा या दिशेने जाणारी मार्गिका खुली करण्यात आली नाही. ही मार्गिका खुली होण्यापूर्वी या मार्गिकेला तडा गेला असल्याचे दिसून येत आहे. पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर सुरू होऊन केवळ वर्षभराचा कालावधी पूर्ण झाला आहे. अवघ्या वर्षभरातच या मार्गिकेला तडा गेला असल्याने या बांधकामाबाबत प्रश्न निर्माण होऊ लागला आहे.

या मार्गिकेचा वापरही सुरू नाही तरीही आधीच तडा गेला असल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या मार्गिकेची एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून ती मार्गिका खुली करण्याआधीच दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### बंद मार्गिका मद्यपींचा अड्डा

सध्या जूचंद्र उड्डाणपुलाचे सुरू असलेले काम व पश्चिमेच्या भागातील अपुरे रस्ते यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी या पुलाची एक मार्गिका बंद ठेवण्यात आली आहे. त्या मार्गिकेवर आता मद्यपींचा वावर अधिक प्रमाणात वाढला आहे. रात्रीच्या सुमारास काही गर्दुल्ले पुलावरच मद्यपान करण्यासाठी बसतात. काही वेळा सोबत आणलेल्या मद्याच्या बाटल्या फोडून त्या ठिकाणी टाकतात, तर इतर कचरा टाकणे, लघुशंका करणे अशा प्रकारामुळे पुलावर कचऱ्याचे साम्राज्य तयार होत आहे.



### लोखंडी सुरक्षा कठडे बसविण्याची मागणी

नायगाव उड्डाणपुलाला एमएमआरडीएने फक्त रेल्वेवरील भागात उंच सुरक्षा कठडे बसविलेले आहेत. उर्वरित उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूस व पश्चिमेकडील उतारमार्गिकेवर असलेले आर.सी.सी. सुरक्षा कठडे कमी उंचीचे आहेत. मार्गावरून काही वाहनचालक भरधाव वेगाने जातात, काही नागरिक कठड्याजवळ थांबतात. उड्डाणपुलावर दोन घातक वळणेही आहेत, ज्यांचा अंदाज वाहनचालकांना लगेच येत नाही. परिणामी अपघात झाल्यास कमी उंचीच्या सुरक्षा कठड्यांमुळे पुलावरून कोसळून दुर्घटना होऊ शकते. यासाठी लोखंडी सुरक्षा कठडे (सेफ्टी रेलिंग) बसविण्यात यावेत, अशी मागणी आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# व्हीआयपी सिमच्या नावाने फसवणूक करणारा अटकेत

## सायबर गुन्हे कक्षाच्या पोलिसांना यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** व्हीआयपी मोबाइल नंबरचे सिम कार्ड देण्याच्या बहाण्याने एकाची ६४ हजारांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात सायबर गुन्हे कक्षाच्या पोलिसांना यश आले आहे. अर्नाळा पोलिसांच्या ताब्यात आरोपीला देण्यात आले असून पुढील गुन्ह्याचा तपास ते करत आहेत.

विरारच्या म्हाडा सोसायटीत राहणाऱ्या घनश्याम ओमप्रकाश सिंग (३१) यांचा ११ एप्रिलला दुपारी तीनच्या सुमारास लाइफ टाइम नंबर डॉट कॉम कंपनीच्या व्हॉट्सॲप ग्रुपवरील अभिषेक तिवारी यांनी व्हीआयपी क्रमांकाचे मोबाइल सिम कार्ड आणून देतो, असे सांगत विश्वास संपादन केला होता. त्यानंतर त्यांच्याकडून ६४ हजार रुपये ऑनलाइनने घेऊन त्यांची फसवणूक केली होती. अर्नाळा पोलिसांनी याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. याबाबत तक्रार प्राप्त होताच तक्रारदार यांच्या फसवणूक रकमेची सायबर सेफ पोर्टलवर माहिती घेतली असता ही रक्कम संशयित डीसीबी बँक व मोबाइल क्रमांकाची माहिती मिळण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात आला.

नमूद पत्त्यावर जाऊन खात्री केली असता नमूद आरोपी २ वर्षांपूर्वी राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याच्या व्हॉट्सॲपबाबत तांत्रिक माहिती व विश्लेषणावरून संशयित आरोपी अभिषेक रविशंकर तिवारी (२६) याला मीरा रोड येथून ताब्यात घेतले. त्याची चौकशी करून तसेच त्याच्या मोबाइलची पडताळणी केली असता त्याने हा प्रकार केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले.




### यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त अमोल माडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल वाव्हळ, पोलिस उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर, पोलिस हवालदार प्रवीण आव्हाड, अमिना पठाण, आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

### नागरिकांना आवाहन

पोलिस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, असा फसवणुकीचा प्रकार घडलेला असल्यास तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यास, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा, तसेच www.coybercrime.gov.in या १९३० या हेल्पलाइनवर तक्रार द्यावी.



Scanned with CamScanner

# ...अन् त्यांच्या चेहऱ्यावर परतला आनंद

## पाच पोलिस ठाण्यांनी ८३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल केला परत

लोकमत न्यूज नेटवर्क,

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ ३ मधील विरार, पेल्हार, मांडवी, नालासोपारा आणि अर्नाळा या पाच पोलिस ठाण्यांतील पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करून विविध गुन्ह्यांतील ८३ लाख ६५ हजार ४८४ रुपयांचा मुद्देमाल परत मिळविला तर बुधवारी संध्याकाळी पत्रकार परिषद घेऊन तक्रारदार नागरिकांना तो परत केला आहे. कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यावर आपले दागिने, वाहन, मोबाइल परत मिळाल्याने अनेक तक्रारदारांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. त्यांनी मीरा भाईंदर, वसई, विरार पोलिसांचे आभार मानले.

नालासोपारा, अर्नाळा पोलिस ठाण्यात दाखल गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्ह्यांची पोलिसांनी कौशल्यपूर्ण उकल करून चोरलेल्या वस्तू, मोबाईल असा एकूण ३३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत केला आहे. मुद्देमालांमध्ये दागिने, दुचाकी, मोबाइल फोन, गृहोपयोगी वस्तूंचा समावेश होता. ही कामगिरी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय यांच्या आदेशाने पोलिस उपायुक्त सुहास बावचेंच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पो.आयुक्त चंद्रकांत जाधव, नालासोपारा व.पो. निरीक्षक विलास सुपे, अर्नाळा वरिष्ठ पोलिस निरीक्षक कल्याणराव कर्पे तसेच संबंधित पोलिस अधिकारी, अंमलदार यांनी केली आहे.



पेल्हार पोलिसांनी आरोपीकडून १३ लाख १३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तर मांडवी पोलिसांनी ५ गुन्हयांची उकल करून १ लाख १ हजार ८०६ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कामगिरी सहा.पो. आयुक्त रामचंद देशमुख, विरारचे व. पो. निरीक्षक राजेंद्र कांबळे, पेल्हारचे व.पो. निरीक्षक वसंत लब्दे, पेल्हारचे व. नि.प्रफुल्ल वाघ यांनी केली आहे.

### साडेतीन लाखांचे मोबाइल जप्त

विरार, मांडवी, पेल्हार पोलिस ठाण्यात विविध गुन्ह्यांतील ५० लाख १५ हजार ४८५ रुपये किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आला आहे. विरार पोलिसांनी दाखल गुन्ह्यांचा कौशल्याने तपास करून २८ गुन्ह्यांची उकल केली आहे. आरोपीकडून ३३ लाख ८१ हजार ७१ रुपयांचा मुद्देमाल तर दाखल, मिसिंग झालेले ३ लाख ६८ हजार १२५ रुपये किमतीचे २३ मोबाईल असा ३६ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.



Scanned with CamScanner

# चोरी के अपराध में 1 गिरफ्तार

# 02 अपराधों का खुलासा

**पेल्हार पुलिस स्टेशन की कार्रवाई, माल जब्त**

**प्रवासी संदेश टीम।**

वसई। नालासोपारा पूर्व के रिचर्ड कंपाउंड स्थित रुद्र कॉर्पोरेशन फैब्रिकेशन वर्क कंपनी के बाहर फेब्रिकेशन की लोहे की कंपोज़िट बीम दिनांक 15 अप्रैल 14.00 बजे से 16 अप्रैल 2023 के 09.00 बजे के बीच किसी ने चोरी कर ली थी। जिसकी कीमत 20 हजार रुपये थी। इस संबंध में 17 अप्रैल 2023 को वादी संतोष शशिकांत पाटिल द्वारा अज्ञात चोर द्वारा 20 हजार रुपये मूल्य के गढ़े हुए लोहे के कम्पोजिट बीम की चोरी के संबंध में दी गई शिकायत पर अज्ञात आरोपी के खिलाफ पेल्हार पुलिस स्टेशन में दर्ज किया गया था. उपरोक्त अपराध को लेकर पेल्हार अपराध जांच शाखा के अधिकारियों और प्रवर्तकों ने तुरंत जांच की और अंडरकवर मुखबिर से प्राप्त जानकारी और अपराध स्थल के सीसीटीवी फुटेज के आधार पर आरोपी निखिल भोईर उम्र 20 वर्ष को हिरासत लेकर पूछताछ की। जिसमें पता चला कि इस अपराध को करने के लिए उसने नायगांव से एक रिक्शा चोरी कर वारदात को अंजाम दिया है। आरोपी को 09 मई 2023 को गिरफ्तार किया गया और उसके पास से एक लोहे का कम्पोजिट बीम और एक ऑटो रिक्शा जब्त किया गया। गिरफ्तार अभियुक्तों में उस पर पूर्व में वालिव थाने व पेल्हार थाने में वाहन चोरी व अन्य चोरी के मामले दर्ज हैं. इस प्रदर्शन में सुहास बावचे, पुलिस उप आयुक्त, परिमंडळ – 3, विरार, रामचंद्र देशमुख, सहायक पुलिस आयुक्त, विरार विभाग, के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, व गुन्हे प्रकटीकरण पथक के पु.उप.नि. सनिल पाटील, पु. हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पु. अंम संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, निखिल मंडलिक ने की है।

Scanned with CamScanner

# बागेश्वर सरकार कार्यक्रम के चोरों की गैंग चढ़ी पुलिस के हत्थे

**भायंदर:** पिछले महीनो मीरारोड में आयोजित बागेश्वर सरकार पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री के दरबार के दौरान नागरिकों के गले से चोरी हुए सोने के आभूषण चुराने वाली गैंग को मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय ने गिरफ्तार कर करीब 50 लाख का माल



बरामद कर पीड़ितों को वापिस लौटाने पर पीड़ितों ने राहत की सांस ली है।

जानकारी के अनुसार मार्च में बागेश्वर सरकार के दरबार के दौरान महिलाओं व पुरुषो को निशाना बनाकर चोरों के गिरोह ने करीब 150 ग्राम सोने के आभूषण साफ किए थे जिसकी शिकायत के पश्चात मीरारोड पुलिस ने मामले दर्ज किए थे साथ ही अपराध शाखा काशीमीरा भी इस मामले की समानांतर जांच कर रही थी। अपराध स्थल से स्थानीय नागरिकों द्वारा दी गई जानकारी के अनुसार पुलिस को अधिक सुराग मोबाइल फोन और पटना अहमदाबाद राष्ट्रीय राजमार्ग पर लगे सीसीटीवी से प्राप्त हुई फुटेज का विश्लेषण करने के बाद, आरोपी राजस्थान के भरतपुर और अलवर के निवासी पाए गए जो धार्मिक, राजनीतिक सामाजिक आयोजन स्थल पर सुनने के बाद, मंगलसूत्र, चेन, जैसे आभूषण चुरा लिए। जांच में पता चला कि उनका नेतृत्व करने वाले पुरुष, महिलाएं चोरी के गहने अपने नेता को दे देते हैं और जिस नेता को गहने दिए जाते हैं वह गांव भाग जाता है ताकि मुद्दा माल बरामद न हो सके पुलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, के मार्गदर्शन में मिरारोड थाने की अपराध शाखा के आदेश पर 4 विशेष पुलिस दलों का गठन कर स्थानीय पुलिस के सहयोग से भरतपुर जिले में कई दिनों तक डेरा डालकर जोखिम में रहकर उक्त प्रकरण की विशेष जांच की गयी. जहा से हेरोदेवी सूरज, अलवर, राजस्थान ,पिकी सूर्यप्रतापसिंह उर्फ राहुल, राजस्थान, सोनिया अनिल कृसर, अलवर, राजस्थान ,रंजीत कुमार उर्फ प्रवीण कुमार जगदीश प्रसाद बावरिया, मैनपुरी, उत्तर प्रदेश, की जांच के बाद उपरोक्त आरोपियों की संलिप्तता का पता चलने पर गिरफ्तार उनके पास से 50,लाख मूल्य के सोने के जेवरात जब्त कर गिरफ्तार किया गया है।

Scanned with CamScanner

DIGITAL
मुंबई। शनिवार 13 मई 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# पुलिस ने पीड़ितों को लौटाया चोरों से बरामद माल

## चेहरे पर खिली मुस्कान

## नागरिकों ने की जमकर प्रशंसा

**प्रवासी संदेश टीम।**

वसई। मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत परिमंडल 3 के पेल्हार, विरार, मांडवी, नालासोपारा व अनार्ला पुलिस थानों की हद में चोरों का शिकार बने पीड़ितों को कल पुलिस ने बड़ा तोहफा दिया। पुलिस ने पीड़ितों को चोरों से बरामद किया गया माल वापस लौटा दिया, जिससे नागरिकों के चेहरे पर खुशी की लहर देखने को मिली। पुलिस द्वारा किए गए इस सराहनीय कार्य की नागरिकों ने जमकर प्रसंशा भी की है। मिली जानकारी के अनुसार, नालासोपारा, विरार पुलिस स्टेशन में 'मुद्देमाल वितरण कार्यक्रम' आयोजित किया गया, जिसमें नालासोपारा, विरार पुलिस स्टेशन के अलावा पेल्हार, मांडवी व अर्नाला पुलिस स्टेशन के अधिकारी भी मौजूद रहे।

### 83 लाख से अधिक सामग्री

इस कार्यक्रम में 3 पुलिस स्टेशनों में दर्ज विभिन्न मामलों के आरोपितों से सामान जप्त कर नागरिकों को वापस किया गया। पुलिस के मुताबिक, विभिन्न थानों में दर्ज चोरी, लूट, छिनैती व सेंधमारी जैसे गंभीर मामलों को पुलिस ने अपनी सूझ-बूझ एवं मेहनत से सुलझाया तथा अपराध की विवेचना के दौरान आरोपियों के पास से बरामद चोरी-लूट आदि लगभग 83 लाख 75 हजार 848 रुपए का कीमती सामान व मोबाइल फोन आदि नागरिकों को पुलिस अधिकारियों के हाथों वापस लौटाया गया।

### वरिष्ठों की देखरेख में

उक्त कार्यक्रम में पुलिस आयुक्त मधुकर पांडेय के आदेश और परिमंडल 3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे के मार्गदर्शन पर विरार विभाग के सहायक पुलिस आयुक्त रामचंद्र देशमुख व नालासोपारा विभाग के एसीपी चंद्रकांत जाधव की देखरेख में पीड़ित नागरिकों को उनका सामान वापस किया गया। इस मौके पर पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, विरार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले, मांडवी पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक प्रफुल्ल वाघ, नालासोपारा पुलिस स्टेशन के पीआई विलास सुपे व अनार्ला थाने के पीआई कल्याणराव करपे आदि उपस्थित रहे।

Scanned with CamScanner

DIGITAL
मुंबई। शनिवार 13 मई 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# स्कैम कॉल के खिलाफ एमबीवीवी पुलिस ने किया अलर्ट

■ प्रवासी संदेश टीम।

**वसई।** मीरा भायंदर-वसई विरार (एमबीवीवी) पुलिस से जुड़ी साइबर क्राइम सेल ने व्हाट्सएप पर अंतरराष्ट्रीय नंबरों से संभावित स्कैम कॉल के खिलाफ अलर्ट जारी किया है। एडवाइजरी में कहा गया है कि यह पता चला है कि लोग +84, +62, +60 और +92 से शुरू होने वाले अंतरराष्ट्रीय नंबरों से अज्ञात कॉल प्राप्त कर रहे हैं और साइबर अपराधियों द्वारा फँसाया जा रहा है।




आईएसडी कोड इंगित करते हैं कि व्हाट्सएप उपयोगकर्ता मलेशिया, केन्या, वियतनाम और इथियोपिया जैसे देशों से बेतरतीब ढंग से कॉल प्राप्त कर रहे हैं। लोगों को कॉल रिसीव न करने की सलाह देने के अलावा, साइबर क्राइम सेल ने किसी भी संदेश या लिंक पर क्लिक करने के खिलाफ भी चेतावनी दी है जो उन्हें अज्ञात कॉलर से मिल सकता है क्योंकि उनमें महत्वपूर्ण डेटा चोरी करने के लिए खतरनाक मैलवेयर हो सकता है जिसका उपयोग धोखाधड़ी करने के लिए किया जा सकता है। आपके बैंक खातों या डिजिटल वॉलेट से मौद्रिक लेनदेन।

एडवाइजरी में आगे कहा गया है कि लोगों को अपने व्हाट्सएप सेटिंग्स में टू स्टेप वेरिफिकेशन को इनेबल करना चाहिए, कभी भी वन टाइम पासवर्ड (ओटीपी) या अन्य व्यक्तिगत जानकारी को अज्ञात कॉलर्स के साथ साझा नहीं करना चाहिए। ऑनलाइन लेन-देन के दौरान सावधानी बरतने की चेतावनी देते हुए, पुलिस ने नागरिकों से किसी भी साइबर अपराध की रिपोर्ट करने के लिए समर्पित हेल्पलाइन नंबर 1930 या www.cybercrime.gov.in का उपयोग करने की अपील की है।

Scanned with CamScanner